


धर्मा प्रॉडक्शन्स - एव्हीके पिक्चर्स घेऊन येत आहेत 'ये रे ये रे पैसा 3'

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 28/03/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 67 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com

# अण्णा बनसोडे सभागृहाचे कामकाज यशस्वीपणे पार पाडतील - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई, ज्येष्ठ सदस्य अण्णा बनसोडे यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर विधानसभेच्या उपाध्यक्षपदापर्यंत मजल मारली आहे. त्यांचा राजकीय प्रवास राजकारण व समाजकारणात कार्यरत असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. मेहनत, संघर्ष आणि लोकसेवा या तीन गोष्टींवर श्रद्धा ठेवून वाटचाल करणाऱ्या अण्णा बनसोडे यांनी आज विधानसभा उपाध्यक्षपदाची मोठी जबाबदारी स्वीकारली आहे. प्रत्येक सदस्याच्या हक्कांचे रक्षण करणे, सर्वांना समान न्याय आणि संधी मिळवून देणे, ही जबाबदारी ते निःपक्षपातीपणे पार पाडतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.**





महाराष्ट्र विधानसभेच्या 22 व्या उपाध्यक्षपदी पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा दादू बनसोडे यांची बिनविरोध निवड झाली.

त्यांच्या निवडीच्या निमित्ताने विधानसभेत अभिनंदनाच्या ठरावावर बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, जेव्हा कोणी सभागृहाच्या अध्यक्षपदी किंवा उपाध्यक्षपदी निवडून येतो, तेव्हा तो एका पक्षाचा नसतो, तर संपूर्ण सभागृहाचा होतो. प्रत्येक सदस्याच्या हक्कांचे रक्षण करणे, सर्वांना समान न्याय आणि संधी मिळवून देणे, कामकाज निष्पक्षपणे चालवणे, ही मोठी जबाबदारी असते. मला विश्वास आहे की अण्णा बनसोडे ही जबाबदारी यशस्वीपणे निभावतील.

पिंपरी-चिंचवड सारख्या उद्योगनगरीत स्थलांतरित कामगारांची मोठी संख्या आहे. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी अण्णांनी नगरसेवक आणि स्थायी समिती अध्यक्ष म्हणून मोठे योगदान दिले आहे. विशेषतः झोपडपट्टी भागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी विशेष काम केले आहे.

कोरोना संकटाच्या काळात अण्णा बनसोडे यांनी त्यांच्या आमदार निधीतून कोरोना लसीकरणासाठी 25 लाख रुपये देण्याबरोबरच पिंपरी-चिंचवडच्या 'वायसीएम' रुग्णालयासाठी सव्वा कोटी रुपये देऊन आरोग्य सुविधांसाठी मोठा हातभार लावला.

त्यांच्या समाजसेवेचा हा वारसा पुढेही सुरू राहील, तसेच उपाध्यक्षपदाची मिळालेली जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करावी-जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत (सीएमईजीपी) प्रकल्प उभारण्यासाठी येणाऱ्या प्रस्तावांवर सकारात्मक कार्यवाही करावी. यातील प्रलंबित राहिलेली प्रकरणांच्याबाबतीत त्यामागील कारणे शोधून त्यावर तात्काळ उपाययोजना करुन अधिकाधिक प्रकरणात कर्ज वितरीत करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय पतपुरवठा आराखड्याच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी आयोजित जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, बँक ऑफ महाराष्ट्रचे क्षेत्रीय महाव्यवस्थापक डॉ. जावेद मोहनवी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे सहायक महाव्यवस्थापक भूषण लगाटे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक योगेश पाटील, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी आदींसह विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी



श्री. डूडी म्हणाले, पीक कर्जाचे (किसान क्रेडिट कार्ड) उद्दिष्ट ६ हजार ३७० कोटी असून फेब्रुवारी २०२५ अखेर उद्दिष्टाच्या १०२ टक्के म्हणजेच ६ हजार ५३१ कोटी रुपये कर्ज वितरण करण्यात आले आहे. ही चांगली कामगिरी आहे. तथापि, मत्स्यवसाय तसेच पशुसंवर्धनासाठी किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत उद्दिष्टानुसार कर्ज वितरण होण्याची आवश्यकता असून यासाठी सर्व बँकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. कृषी मुदत कर्ज आणि कृषी पायाभूत सुविधांसाठीच्या कर्जाचा लक्ष्यांक वाढविण्यात यावा. पुढील वर्षात कृषी पायाभूत सुविधांसाठी जिल्ह्यात जास्तीत जास्त निधी देण्यात येणार असून त्यासाठी पीक निहाय समूह पद्धतीने पायाभूत सुविधा विकास करण्यात येणार आहे. त्यासाठी चांगल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांना या योजनेंतर्गत निवडलेल्या पिकांच्या निर्यातीसाठी सर्व ती मदत करण्यात येणार आहे. काढणीपश्चात प्री कुलींग, वाहतूक, शेतमाल टिकविण्याची प्रक्रिया आदी शीतसाखळी निर्मितीसाठी मदत करण्यात येणार असून या अनुषंगाने कर्जपुरवठ्याबाबत बँकांचे सहकार्यही आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

# न्युमरोस मोटर्सतर्फे मल्टीपर्पज ई- स्कूटर डिप्लोस मॅक्स पुण्यात लाँच

## विविध उपयोगांसाठी तयार करण्यात आलेली ही ई- स्कूटर अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि टिकाऊ

## वैविध्यपूर्ण भौगोलिक प्रदेशांत आतापर्यंतची सर्वात मोठी 13.9 दशलक्ष किलोमीटर्सची पायलट टेस्ट करणारी पहिली भारतीय ओईएम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, न्युमरोस मोटर्स या आधुनिक आणि देशांतर्गत इलेक्ट्रिक वाहने बनवण्यात आघाडीवर असलेल्या ओरिजनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर कंपनीने मल्टी-युटिलिटी ई स्कूटर, डिप्लोस मॅक्स पुण्यात लाँच केली आहे. हरित वाहतुकीची समीकरणे नव्याने प्रस्थापित करण्यासाठी खास तयार करण्यात आलेल्या डिप्लोस मॅक्सद्वारे कंपनीने वैयक्तिक वाहतूक सुविधा क्षेत्रात प्रवेश केला आहे. त्यासाठी कंपनीने डिप्लोस प्लॅटफॉर्मअंतर्गत विविध उपयोगांसाठी हे वाहन तयार केले आहे. हे वाहन सुरक्षा, विश्वासर्हता आणि टिकाऊपणाचे प्रतीक असून ग्राहकांच्या वेगवेगळ्या गरजा पुरवण्यासाठी आदर्श आहे. डिप्लोस मॅक्सची एक्स शोरूम पुणे, किंमत केवळ १,१३,३९९ रुपये आहे.कंपनीने भारतातील आतापर्यंतची सर्वात मोठी पायलट टेस्ट घेतली असून त्यामध्ये १३.९ दशलक्ष किलोमीटर्सचे अंतर पार




करण्यात आले आहे. अशी मोठी पायलट टेस्ट घेणारी कंपनी भारतातील पहिलीच ओईएम ठरली आहे.

जबरदस्त सुरक्षा, टिकाऊपणा आणि विश्वासार्हता यांसह डिप्लोस स्कूटर्सच्या श्रेणीने विविध भौगोलिक प्रदेश सहजपणे पार करत इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील नाविन्यपूर्णतेचा नवा मापदंड रचला आहे. यासह कंपनी भारतातील ईव्ही स्कूटर्सचे भविष्य नव्याने प्रस्थापित करण्यासाठी सज्ज आहे.डिप्लोस प्लॅटफॉर्म अत्याधुनिक इंजिनियरिंग आणि नाविन्यपूर्ण डिझाइनचा वापर करून बनवण्यात आला असून त्याद्वारे ग्राहकांना पूर्णपणे कनेक्टेड व सफाईदार अनुभव दिला जातो. हा अनुभव सुरक्षा, विश्वासार्हता आणि टिकाऊपणा या तीन तत्वांवर आधारित असतो.सुरक्षा: डिप्लोस प्लॅटफॉर्ममध्ये ड्युएल डिस्क ब्रेक्स, हाय परफॉर्मन्स एलईडी लायटिंग आणि अत्याधुनिक स्मार्ट वैशिष्ट्ये देण्यात आली असून त्यात थेफ्ट अलर्ट्स, जिओ फेन्सिंग, व्हिइकल ट्रॅकिंग यांसारख्या उच्च दर्जाच्या सुरक्षा सुविधांचा समावेश आहे.

विश्वासार्हताः चासिस, बॅटरी, मोटर, कंट्रोलर यांसारख्या वाहन यंत्रणा दीर्घकाळ टिकतील आणि सातत्याने दर्जेदार कामगिरी करतील याचा विचार करून डिझाइन, इंजिनियर आणि समाविष्ट करण्यात आल्या आहेत.टिकाऊपणाः यातली मजबूत, चौकोनी चासिस आणि रूंद टायर्स दीर्घकाळ टिकणारे असून त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या भूभागांवर चांगली पकड मिळते व ते बराच काळ टिकते.न्युमरॉस मोटर्सचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. श्रेयस शिबुलाल म्हणाले, 'न्यूमरॉस मोटर्समध्ये आम्ही शाश्वत यंत्रणेचा पाया रचण्यासाठी हरित व कार्यक्षम वाहन सुविधा देण्याचेउद्दिष्ट ठेवले आहे. डिप्लोस प्लॅटफॉर्म नाविन्यपूर्णता, सुरक्षा आणि पर्यावरणाप्रती वाटणारी जबाबदारी यासाठी वाटणाऱ्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

भारतीय बनावटीचे आणि सुरक्षित, टिकाऊ व विश्वासार्ह वाहन उपलब्ध करून देत आम्ही आमच्या ग्राहकांच्या वैविध्यपूर्ण गरजा पूर्ण करण्याचे आणि भारत व जगभरातील हरित वाहतूक क्षेत्राला भरीव योगदान देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे लाँच आमचे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवहार्य डिझाइन यांचा मेळ घालण्यावर असलेला भर दर्शवणारे आहे. त्याद्वारे 'गेट इट डन' या तत्वानुसार वाहतूक क्षेत्राच्या भविष्याला आकार देता येईल आणि जग कायमच 'ऑलवेज मूविंग ठेवता येईल,

# क्रीडा क्षेत्रातही नावलौकिक प्राप्त करा - वैष्णवी सायकर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : आई-वडील दैवत आहे. त्यांचे आणि शिक्षकांच्या आज्ञेचे पालन करावे, अभ्यासाबरोबर खेळातही जागरूक राहून नियमित सराव करत राज्य, देश पातळीवर क्रीडा स्पर्धांत भाग घेऊन नावलौकिक प्राप्त करा, अशी प्रतिक्रिया राष्ट्रीय बेसबॉल, सॉफ्टबॉल खेळाडू वैष्णवी सायकर यांनी दिली. त्या गणेशखिंड येथील प्राथमिक विद्या मंदिर (मॉडर्न) शाळेत वार्षिक कला क्रीडा बक्षीस समारंभ कार्यक्रमात बोलत होत्या. नुकतेच गणेशखिंड येथील प्राथमिक विद्या मंदिर (मॉडर्न) शाळेत मुख्याध्यापक विठ्ठल मोहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि. २२ मार्च) वार्षिक कला क्रीडा बक्षीस समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिक्षक-पालक संघाचे उपाध्यक्ष विशाल थोरात, प्रेरणा पडवळ, दीपक मराठे, सतीश लिंबेकर या प्रसंगी उपस्थित होते. या वेळी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक शंकररावजी कानिटकर व विद्येचे आराध्य दैवत सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.शाळेची माजी विद्यार्थिनी व राष्ट्रीय खेळाडू वैष्णवी सायकर यांच्या हस्ते वर्षभर कला क्रीडा स्पर्धांत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. डॉ. भानुदास कुलाळ यांनी सूत्रसंचालन केले.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 28/03/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# दोन लाखांहून अधिक मुलांचे 'जेई' लसीकरण पूर्ण

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाची लसीकरण मोहीम होत आहे यशस्वी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या अंतर्गत सुरू असलेल्या जापनीज मेंदूज्वर (जेई) प्रतिबंधक लस मोहिमेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत शहरातील दोन लाखांहून अधिक बालकांना ही लस देण्यात आली आहे. शहरात हे लसीकरण अभियान यशस्वीपणे राबवण्यात येत असून जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

शहरातील आरोग्य केंद्रे, शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये ही प्रभावी लसीकरण मोहीम सुरू आहे. या मोहिमेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय. संपूर्ण शहरात राबवण्यात येत असलेल्या या मोहिमेत २५ मार्च २०२५ पर्यंत २ लाख ७ हजारांहून अधिक बालकांचे जेई लसीकरण करण्यात आले आहे.

रुग्णालयाचे नाव : लसीकरण झालेल्या बालकांची संख्या आकुर्डी रुग्णालय : ३० हजार ९९७ भोसरी रुग्णालय : ३६ हजार ६७९ जिजामाता रुग्णालय : ३१ हजार ६४० सांगवी रुग्णालय : २२ हजार ११८ तालेरा रुग्णालय : २३ हजार २१२ थेरगाव रुग्णालय : १६ हजार ७३० यमुनानगर रुग्णालय : ३८ हजार २४ यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय : ८ हजार १६०

बालकांचे आरोग्य ही आपल्या शहरासाठी प्राथमिकता आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका त्यामुळेच जेई लसीकरण मोहीम व्यापक स्वरूपात राबवत आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी पालक, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्था यांचे उत्तम सहकार्य मिळत आहे. भविष्यातही आरोग्य क्षेत्रात अशी परिणामकारक पावले उचलण्याचे नियोजन आहे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जापनीज मेंदूज्वर (जेई) हा विषाणूजन्य आजार असून याकडे देशातील सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक म्हणून पाहिले जाते. त्यामुळे या जीवघेण्या आजारावरील प्रतिबंधात्मक लसीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत जेई लसीकरण मोहीम शाळा, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि विशेष लसीकरण शिबिरांमध्ये प्रभावीपणे राबवत आहे. या अंतर्गत शहरातील सर्व मुलांचे शालेय व समाजस्तरावर मोफत लसीकरण केले जात आहे.

- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जापनीज मेंदूज्वर ही लस यापूर्वी घेतली असली तरी सध्या सुरू असलेल्या लसीकरण मोहिमेअंतर्गत ती पुन्हा घेणे आवश्यक आहे. जेणेकरून रोगप्रतिकारशक्ती वाढेल आणि या आजाराचा प्रसार रोखता येईल. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांचे लसीकरण करून घ्यावे.

- डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे

## यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



**पिंपरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांकडून, कार्यकर्त्यांकडून कौतुकांचा वर्षाव व शुभेच्छांचा पाऊस**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा काल (बुधवार) शेवटचा दिवस होता.कालच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू होती. हे अधिवेशन अनेक कारणांमुळं गाजलं. सामान्य लोकांच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नापेक्षा इतर मुद्दे या अधिवेशनात चर्चेत आले.त्याच प्रमाणे अजून एक महत्वाचा विषय तो म्हणजे विधानसभा उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) अण्णा दादू बनसोडे यांची बिनविरोध आणि एकमतानं झालेली निवड..."विधानसभा उपाध्यक्षपदी अण्णा बनसोडे यांची निवड झाली.त्याबद्दल मी त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन करतो. बनसोडे यांनी बराचकाळ समाजकारण, राजकारणात काम केलं आहे.महानगरपालिका नगरसेवक ते आमदार आणि आता विधानसभा उपाध्यक्षपदी असा त्यांचा प्रवास हा नक्कीच अभिमानास्पद असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि अण्णा बनसोडे या दोघांच्या समन्वयातून या सभागृहाला निश्चितपणे न्याय मिळेल", असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.तसेच पुढं म्हणाले की, "महाराष्ट्र विधानमंडळाला फार मोठी परंपरा आहे. या गौरवशाली परंपरेला पुढं नेण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. भारताचं संविधान किती मोठं आहे. सामान्यातल्या सामान्य माणसाला देखील मोठ्या पदावर जाण्याची संधी मिळते. संधीची समानता हे संविधानामुळं मिळाली आहे. आज पाहू शकतो की,चहा टपरीवर काम करणारे पंतप्रधान झाले. ऑटो रिक्षा चालवणारे राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि एक पान टपरीवाले राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष झाले आहेत" असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी अण्णा बनसोडे यांचं कौतुक केलं आहे.यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही अण्णा बनसोडे यांचं अभिनंदन केलं. दरम्यान, यावेळी २०१९ विधानसभा निवडणुकीत अण्णा बनसोडेंना पक्षाकडून एबी फॉर्म आपण कसा दिला.याबद्दल मजेशीर किस्सा अजित पवारांनी सभागृहात सांगितला...

# धर्मा प्रॉडक्शन्स - एव्हीके पिक्चर्स घेऊन येत आहेत 'ये रे ये रे पैसा 3'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

धमाल मनोरंजन आणि विनोदाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या 'ये रे ये रे पैसा' आणि 'ये रे ये रे पैसा २' या सुपरहिट चित्रपटांच्या प्रचंड यशानंतर, आता या फ्रँचायझीचा तिसरा भाग म्हणजेच 'ये रे ये रे पैसा ३' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा दमदार टीझर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला असून त्याला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. येत्या १८ जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. वैशिष्ट्य म्हणजे, बॉलिवूडला एकाहून एक जबरदस्त चित्रपट देणारे धर्मा प्रॉडक्शन्स आणि एव्हीके पिक्चर्स पहिल्यांदाच एकत्र येत असून धर्मा प्रॉडक्शन्स या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे. त्यामुळे आधीच भव्य असणाऱ्या या चित्रपटाची भव्यता आता आणखीनच वाढणार आहे.

पुन्हा एकदा अण्णा, आदित्य, बबली आणि सनी एकत्र आल्याने मोठा धमाका उडणार असल्याचे दिसतेय. एकंदरच टीझर पाहाता यावेळचा धमाका तिप्पट असणार हे नक्की! 'ये रे ये रे पैसा ३' मध्ये पाच करोडचा घोळ आणि त्यात आलेले नवीन ट्विस्ट काय असतील, हे प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच समजेल. धर्मा प्रॉडक्शन्स, अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, न्युक्लिअर ॲरो यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून वर्डविझार्ड एंटरटेनमेंट यांनी सहनिर्मिती केली आहे. सुधीर कोलते, ओमप्रकाश भट्ट, नासीर शरीफ, ओंकार सुषमा माने, स्वाती खोपकर, निनाद नंदकुमार बत्तीन, गिरीधर गोपाळकृष्ण धुमाळ हे निर्माते असून संजय जाधव दिग्दर्शित या चित्रपटात संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, उमेश कामत, तेजस्विनी




पंडित, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. दिग्दर्शक संजय जाधव म्हणतात," 'ये रे ये रे पैसा ३' हा चित्रपट माझ्यासाठी केवळ एक सिक्वेल नाही, तर प्रेक्षकांचे प्रेम आहे. पहिल्या दोन भागांना प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले, त्यामुळे चित्रपटाचा तिसरा भागही त्याच तोडीचा असावा, यासाठी आम्ही पुरेपूर प्रयत्न केला आहे. 'ये रे ये रे पैसा ३' हा चित्रपटही प्रेक्षकांचे नक्कीच मनोरंजन करेल, याची मला खात्री आहे. हा धमाकेदार चित्रपट मोठ्या पडद्यावर अनुभवण्यासाठी सगळ्यांनी आपल्या कुटुंबासोबत तयार राहावे."निर्माते अमेय खोपकर म्हणतात," 'ये रे ये रे पैसा ३' हा चित्रपट माझ्यासाठी खूप खास आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने धर्मा प्रॉडक्शन्स आणि एव्हीके पिक्चर्स पहिल्यांदाच एकत्र येत आहेत. धर्मा प्रॉडक्शनचा हा पहिलाच मराठी सिनेमा असून त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव खूप छान होता. धर्मा प्रॉडक्शन्सच्या सहकार्याने आम्ही प्रेक्षकांसमोर चांगली दर्जेदार कलाकृती सादर करत आहोत. आम्ही चित्रपटाच्या तिसऱ्या भागासाठी एक वेगळा आणि नवीन दृष्टिकोन ठेवला आहे. आम्हाला खात्री आहे की, मागच्या दोन्ही चित्रपटांसारखा तिसऱ्या भागावरही प्रेक्षकवर्ग भरभरुन प्रेम करतील.

"धर्मा प्रॉडक्शन्सचे अपूर्व मेहता म्हणतात, " या चित्रपटाच्या दोन्ही भागांनी यापूर्वीच प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. त्यामुळे आम्हाला खूप आनंद होतोय, की मराठीत आमचे पदार्पण या चित्रपटातून होतेय. एव्हीके पिक्चर्सच्या परिवारासोबत यानिमित्ताने आम्ही जोडले गेलो आहोत. दिग्दर्शक, कलाकार सगळेच नावाजलेले आहेत. त्यांच्यासोबत काम करताना मजा आली."

# ढोले पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ने "KSHITIJ 2024-25" संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे ढोले पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (DPCOE) ने आपल्या वार्षिक सामाजिक समारंभ "KSHITIJ 2K25" चे आयोजन 18 मार्च ते 24 मार्च 2025 दरम्यान यशस्वीरित्या पूर्ण केले.एक आठवड्याचा हा समारंभ अत्यंत यशस्वी ठरला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजनाचा एकत्रित अनुभव घेतला.




कार्यक्रमाची सुरुवात 18 मार्च रोजी कमल उल्हास क्रीडा मैदानावर क्रीडा स्पर्धांसह झाली, ज्याने पुढील कार्यक्रमांसाठी चांगली तंदुरुस्ती दिली.विद्यार्थ्यांनी एकांकिका, काव्य वाचन, आणि गेमिंग अशा विविध सादरीकरणांमध्ये आपली प्रतिभा दाखवली.लुक-अलाइक डे, वादविवाद, पथनाट्य (स्ट्रिट प्ले) आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांनी कॉलेजच्या परिसरात उत्साह निर्माण केला. याशिवाय कला प्रदर्शन, हॅलोवीन डे सेलिब्रेशन, आणि एक रंगारंग फन फेअर मध्ये देखील विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. कार्यक्रमाचा शेवट 24 मार्च रोजी झाला, ज्या दिवशी सांस्कृतिक सादरीकरणे, फॅशन शो आणि इलेक्ट्रिफायिंग डीजे नाइटसह समारंभाचा समारोप करण्यात आला,जो उत्साही वातावरणात पार पडला.

सदर कार्यक्रमास मुख्य पाहुणे म्हणून,सागर उल्हास ढोले पाटील, अध्यक्ष, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी (D P E S), हे उपस्थित होते.सरांच्या प्रोत्साहनामुळे कार्यक्रमाला वेगळीच झळाळी मिळाली. सरांचे अत्यंत मोलाचे योगदान, सहकार्य व त्यांच्या समर्थनामुळे "K S H I T I J 2K25" हा कार्यक्रम सर्वांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला. हा कार्यक्रम सांस्कृतिक समितीच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला, ज्याचे नेतृत्व प्रा .सुप्रिया शेळके, प्रा. भुषण करमकर, प्रा. मनीषा काकडे कॉलेज चे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर आणि डॉ. अभिजीत दंडवते यांनी केले. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना त्यांच्या सृजनशीलतेला उभारी देण्यासाठी आणि कॉलेजच्या समुदायामध्ये मजबूत नातेसंबंध निर्माण करण्यासाठी उत्तम मंच प्रदान केला.

# आग रोखण्यासाठी 'आरटीओ'ची मोहीम




पुणे : उन्हाची तीव्रता, वाढते तापमान आणि यामुळे धावत्या वाहनांना अचानक लागणारी आग, या पार्श्वभूमीवर सुरक्षात्मक उपाययोजनांसंदर्भात उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे (आरटीओ) व्यावसायिक वाहनांची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. वाहनांमध्ये सुरक्षात्मक उपाययोजना आणि इतर सरकारच्या आदेशाचे पालन होत आहे किंवा नाही, याची पडताळणी करण्यात येणार आहे. यामध्ये विशेषत: शालेय वाहनांपासून ते कंपन्यांच्या वापरासाठी लागणारी खासगी आणि अंतर्गत वाहने तसेच रिक्षा आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा समावेश असणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968